IMPACT FACTOR 5.473 (SJIF)
UPA NATIONAL E-JOURNAL
Interdisciplinary Peer-Reviewed Indexed E-Journal
ISSN 2455-4375

# आंबेडकरवादी कवयित्रीच्या कवितेतील वेदना आणि विद्रोह

**डॉ. मंगला डाहाट**
सहयोगी प्राध्यापक व विभाग प्रमुख
संताजी महाविद्यालय नागपूर
९८२२४९५३२३
dahat.mangla@gmail.com

## प्रस्तावना :—

आंबेडकरी चळवळीच्या काळातील दलित लेखिकांच्या लेखनाचा परामर्ष घेतलयास त्यांचे लेखन वैचारिक व ललित अशा दोन प्रकारातील आढळते. प्रत्यक्ष चळवळीच्या काळात दलितांचे प्रबोधन करणारी नियतकालिके म्हणजे मूकनायक, बहिष्कृतभारत, जनता, समता, दलित बंधू, दलित सेवक ही आहेत. त्या काळातील स्त्रियांनी आपल्या जीवनातील अनुभव ओबडधोबड शब्दात मांडले आहेत.

आंबेडकरी चळवळीत मोठया प्रमाणावर स्त्रिया सहभागी झाल्या होत्या, त्यांची मने आंबेडकरी प्रेरणेने घडली होती. चळवळीतील स्त्रियांचे विश्व हळूहळू पालटत होते. तशीही दलित अस्पृश्य स्त्री मुळातच बाणेदार आणि काहीशी स्वतंत्र्य वृत्तीची होती. मात्र समाजव्यवस्थेने लादलेल्या वर्षानुवर्षाच्या दास्यामुळे स्त्रिया हतबल झाल्या होत्या. पण डॉ. आंबेडकरांच्या तेजस्वी वादळी शब्दांनी चळवळीतील स्त्रियांच्या मनावरील युगानुयुगांची राख उडून गेली. तिचे आत्मभान जागे झाले. तिच्यातील अस्मिता प्रज्वलित झाली. जुन्या नव्यातील भेद चळवळीतील स्त्री समजु लागली होती. या चळवळीतील स्त्री मोकळया मनानी आंबेडकरी चळवळीत सहभागी झाल्यामुळे आंबेडकरी नवविचारांचे महत्व तिला पटले. या दलित अस्पृश्य स्त्रीने जाणीवपूर्वक आंबेडकरी विचारांचा स्वीकार केला. हे विचार चळवळीत स्त्रीच्या मनात हळूहळू रूजत गेले व एक जीवनप्रणाली म्हणून एक जीवनविषयक दृष्टिकोन तिच्या आचरणातून प्रकट होवु लागला.

## दलित स्त्री आणि आंबेडकरी चळवळ :—

आंबेडकरी चळवळीतून नवदृष्टीकोन लाभलेली दलित स्त्री आंबेडकरी डोळयांनी समाज जिवनाचे निरिक्षण करायला लागली. तिचे विचार व्यापक होत गेले. तिची चिकित्सा व दृष्टी वाढली. या चळवळीतील स्त्री घडणाऱ्या घटनांची कारणमीमांसा जाणून घेवु लागली या स्त्रीची नव्या मनाने अनुभवाकडे पाहण्याची प्रक्रिया सुरू झाली. ही उर्मी उंचबळून आली आणि ती वेगवेगळया तऱ्हेने प्रकट होऊ लागली. काही लेखणीतून काही लेखनाने काव्यात्म रूप घेतले आणि अशाप्रकारे आंबेडकरी चळवळीत सहभागी झालेली स्त्री अनेक पातळयावर व्यक्त होवु लागली.

धर्मांतरानंतरच्या काळात दलित आंबेडकरी साहित्याच्या चळवळीत अनेक स्त्रिया लेखन करताहेत, त्यात प्रामुख्याने कुमुद पावडे, नलिनी लढके, आशा थोरात, अरूणा लोखंडे अर्मिला पवार सुशील मुलजाधव मीनाक्षी मून शांताबाई कांबळे, बेबी कांबळे, हिरा बनसोडे, ज्योती लांजेवार प्रज्ञा लोखंडे, प्रतिमा आहिरे, संध्या रंगारी, सुरेखा भगत, अर्चना हातेकर, उषा हिंगोणीकर, नलिनी सोमकुवर, सरिता जांभुळे, उषा भालेराव, विमल गाडेकर इ. लेखिका कवयित्री प्रमुख आहे.

सामाजिक परिवर्तनात दलित स्त्रियांच्या भाषणाचे, लेखनाचे व कवितेचे मोठे योगदान आहे. आंबडेकरांच्या विचार प्रेरणेतून निर्माण झालेल्या दलित स्त्रियांच्या लिखाणात विविधता, अनेक पातळयावरचे जीवन व त्याची व्यथा व वेदनांची दाहकता दिसते तसेच पोथीनिष्ठता झुगारून विज्ञानधिष्ठित विचार व आचार स्वीकारून विद्रोही विचार मांडतांना दिसतात. आंबेडकरी चळवळीपासून कथा कविता, आत्मकथा वैचारिक लेखन नाटक कादंबरी इत्यादी साहित्याच्या सर्व प्रांतांत दलित स्त्री लेखिकांनी जे वाङ्.मय निर्माण केले ते विद्रोही स्वरूपाचे असून यामुळे दलित साहित्याची बैठक भक्कम झाली आहे. यात शंका नाही. दलित स्त्रियांनी निर्माण केलेल्या साहित्यातून जी स्त्रीप्रतिमा तयार झाली आहे. ती 'क्रांतीप्रवन' युगसापेक्ष सामाजिक न्यायासाठी संघर्षरत, कर्मनिष्ठ, सर्वकष परिवर्तनासाठी झुंज देण्यासाठी सज्ज नव्या व्यवस्थेसाठी प्रतिबध्द व दलित 'स्त्री सुध्दा मानूस' आहे. या सर्व विचारांशी प्रामाणिक असलेली व पाठपुरावा करणारी आहे. तसेच ती अतिशय त्वेषाने आपल्या जीवन जाणिवा व्यक्त करते.

**भारतीय दलित स्त्रीजीवनाचे वास्तव :—**

भारतीय समाजव्यवस्था ही वर्णव्यवस्थेशी अत्यंत निगडित आहे. वर्णव्यवस्थेपासून जातिव्यवस्था उदयाला आली भारतात फार पूर्वीपासून वर्गविभाजन, अस्पृश्यतेची भावना आणि दासीप्रथा अस्तित्वात असल्याचे अनेक संदर्भ विविध ग्रंथातून सापडतात. भारतीय समाजव्यवस्थेत जातिवाद ही अत्यंत प्रबळवृत्ती आहे. भारतीय समाजरचनेसारखे विविक्षित स्वरूप जगातील इतर कोणत्याही देशात आढळून येत नाही. जातिव्यवस्थेची पाळेमुळी अतिप्राचीन असली तरी तिचे विकृत आणि भ्रष्ट रूप मध्ययुगापासूनच म्हणजे मनुस्मृतीपासून दिसून येते. मध्ययुगात आणि पेशव्यांच्या काळात तर जातिव्यवस्थेने अगदी कळस गाठलेला आढळतो. हजारो वर्षापासून या समाजव्यवस्थेने भारतीय समाजमनावर खोलवर वाईट संस्कार केले आहे.

**दलित स्त्रीच्या जीवनातील वेदना :—**

हिंदु धर्मसंस्थेने अतिशूद्रांना जन्मापासूनच अस्पृश्य ठरविले. अस्पृश्यांना स्वतःचे कर्तुत्व आणि बुध्दिमत्ता दाखविण्याची संधीच नाकारली त्यांचे भविष्य वर्ण आणि कुळांच्या फेऱ्यात अडकविले त्यांच्यावर विद्या घेण्याची व अध्ययनाची कायमची बंदी घातली. त्यामुळे काबाडकष्टाशिवाय दलित अस्पृश्यांना पर्याय उरला नाही. स्वतःच्या जीवनाची क्लोशदायक चाकोरी तोडण्याचा विचार सुध्दा कधी दलितांच्या मनाला शिवू नये अशी व्यवस्था कर्मठ धर्मसंस्थेने करून ठेवली होती. भारतात हजारो वर्षापासून स्त्री वर्ग शोषित आहे. असे असले तरी समाजव्यवस्थेतील सर्वच स्त्रियांच्या शोषणाचे स्वरूप व प्रमाण सारखे नाही. सवर्ण स्त्रियांच्या शोषणाची रूपे व समस्या वेगळया आहेत. भारतीय सर्वसाधारण स्त्री म्हणजेच सवर्ण स्त्री आणि दलित स्त्री यांच्या अवस्थेत बरेच अंतर आहे. भारतीय सवर्ण स्त्रीचे पुरूष प्रधान संस्कृतीने अनेक पातळयांवरून शोषण केले आहे हे खरे आहे मात्र दलित स्त्रीचे एक स्त्री म्हणून पुरूष प्रधान व्यवस्थेकडून शोषण केले जातेच शिवाय दलित स्त्री ही अवर्ण असल्यामुळे वर्णव्यवस्थेकडूनही तिचे शोषण केले जाते भारतीय दलित स्त्री अशी दुहीरी शोषणाची बळी ठरते.

भारतीय दलित स्त्रीजीवनाचे वास्तव जाणून घेताना भारतीय समाजव्यवस्थेतील दलित अस्पृश्य समाजाची अवस्था जाणून घेणे महत्वाचे ठरते. गोपाळ वलेगकर यांच्या 'विटाळ विध्वंसक' या पुस्तकात दलित अस्पृश्याच्या दारून दयनीय दुरवस्थेचे चित्रण प्रभावी रीतीने आलेले आहे. जीवनाच्या विविध

पातळयावर त्यांचा अमानूष असा छळ होत होता. गावामध्ये राहण्यापासून जीवनाचे जगण्याचे कोणतेच हक्क त्यांना दिले गेले नव्हते. असे इतिहासावरून लक्षात येते.

**डॉ. आंबेडकरांचे स्त्री उत्थानविषयक कार्य :—**

एकोणिसाव्या शतकाच्या मध्यात भारतात प्रबोधन पर्वाला प्रारंभ झाला. प्रागतिक विचारांनी भारावलेल्या तत्कालीन अनेक पुढाऱ्यांनी स्त्रियांच्या दु:स्थितीला जबाबदार असणाऱ्या रूढी परंपरांचा निषेध केला. म.जोतीराव फुले व सावित्रीबाई फुले यांनी विकासाकरिता शिक्षणाचे महित्व ओळखून स्त्री शिक्षणाची मुहुर्तमेढ रोवली, इथून स्त्रियांच्या तथाकथित दुर्देवाचे दशावतार फिरायला सुरूवात झाली.

जोतीराव फुल्यांपासून पारंपरिक स्त्री जाणिव बदलाण्याच्या प्रक्रियेला प्रारंभ झाला. भारतीय स्त्रीचे प्रकाशाच्या दिशेने पहिले पाऊल पडले ते जोतीराव फुल्यांच्या विचार प्रकाशातच. एकोणिसाव्या शतकाच्या मध्यात भातात भारावलेल्या तत्कालीन अनेक पुढाऱ्यांनी स्त्रियांच्या दु:स्थितीला जबाबदार असणाऱ्या याच पार्श्वभूमीवर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय स्त्रियांच्या उत्थानाकरिता जे कार्य केले ते विशेष लक्षणीय आहे. सर्वप्रथम ही लक्षात घ्यावे लागेल की डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्री पुरूष समान मानुन या समानतेचा जोरदार पुरस्कार केला. त्यांनी स्त्रीचा उत्थानाकरिता विविध माध्यमातुन भरीव प्रयत्न केले. विविध वर्तमानपत्रांतुन व नियतकालिकांमधुन स्त्रियांची स्थितिगती सांगणारे व स्त्रियांच्या उन्नतीता मार्गदर्शक असे लेखन केले, सभा—संमलेनांमध्ये नैमित्तिक भाषणे देवुन त्यातुन स्त्री विकासाचे मार्ग विशद केलेत विविध कृति कार्यक्रमांचे आयोजन करून त्यांनी स्त्रियांना प्रत्यक्ष चळवळीत सहभागी करून घेतले. तसेच संविधानाची निर्मिती करताना त्यांनी या माध्यमातुन स्त्रियांना समान दर्जा, मुख्य, हक्क प्रदान केला. आणि सर्वात महत्वाचे म्हणजे त्यांनी हिंदु कोड बिलाची निर्मिती करून भारतीय स्त्रीच्या विकासाचा जणु जाहिरनामाच प्रसिध्द केला.

या सर्व गोष्टीमुळे आंबेडकर वादी  विचार घेवुन चालणारी स्त्री सजग, व जागृत झाली व ती आपले विचार मोकळेपणाने  मांडु लागली. आपल्या मनातील विद्रोह कवितेच्या लेखनाच्या माध्यमातुन मांडु लागली, निश्चितच आंबेडकर वादी स्त्रीयांच्या लेखनामध्ये विद्रोह हा प्रकर्षाने पाहायला मिळतो.

**आंबेडकरवादी कवयित्रीचा काव्यातील विद्रोहाचे स्वरूप :—**

दलित साहित्य ही एक चळवळ म्हणुन पुढे आले, ही चळवळ हे साहित्य, डॉ. आंबेडकरांच्या विचारप्रेरणेने, निर्माण झाले या साहित्याच्या, चळवळीच्या केन्द्रस्थानी 'माणुस' आहे. माणसाचे दु:ख व्यथा, अन्याय,शोषण या सर्व गोष्टी दलित साहित्यात येऊ लागल्या सोबतच दलित व आंबेडकरवादी स्त्रीच्या परिवर्तनशील मनावर या सर्व गोष्टीचा खुप प्रभाव पडला आहे असे दिसते.

आंबेडकरी विचार आणि शिक्षण यामुळे दलित स्त्रीला आपल्या वेदनासह अभिव्यक्त करायची उर्मी त्यांच्या मनात निर्माण झाली. दलित स्त्रीचे दु:ख दुहेरी स्वरूपाचे होते प्रस्थापित समाजव्यवस्थेत एक दलित म्हणुन आणि पुरूष प्रधान मानसिकतेतील व्यवस्थेत एक स्त्री म्हणुन दलित स्त्रीयांचे शोषण होत होते. या चळवळीच्या माध्यमाने त्या आविष्कृत होऊ लागला. या साहित्यातुन व्यक्त होणाऱ्या विचारामुळे त्यांच्यात आत्मभान निर्माण झाले. साहित्याच्या वाचनामुळे संपर्कामुळे  दलित स्त्री आपल्या दु:खाकडे अधिक सजगपणे, गंभीरपणे पाहु लागली. दलित स्त्रीला तिचे दु:ख जाणवु लागले, व ते व्यक्त करण्याची उर्मी त्यांच्या मनात निर्माण झाली. कवितेची आणि दु:खाचे  नाते फार जवळचे आहे. त्यामुळे दलित स्त्रीने

आपल्या व्यथा, वेदना व्यक्त करण्यासाठी, भावनांचा आविष्कार करण्यासाठी 'कविता' हेच प्रमुख माध्यम निवडले. भारतात दलित साहित्य प्रथम महाराष्ट्रात जन्मले नि मराठी दलित साहित्याची प्रेरणा घेवुन त्याची पाळेमुळे देशभर पसरू लागली व सर्व साहित्य प्रकाराने व्यक्त होऊ लागली. त्यात कविता हा प्रभावी साहित्य प्रकार आहे.

दलित कवितेतुन विद्रोहाला एक सामाजिक व साहित्यिक मुल्य प्राप्त झाले. मराठी कवितेमध्ये दलित कवितेतील विद्रोहाची ही जाणिव पुर्णत: नविन होती. विद्रोहामुळेच दलित काव्य मराठी कवितेत व एकुणच भारतीय साहित्यात आपल्या वेगळेपणाने उठुन दिसते.

विशेषत: आंबेडकरवादी कवयित्रीची कविता लक्षणीय आहे, आंबेडकरवादी कवयित्रीनी जी कविता लिहायला प्रारंभ केला ती दलित कवितेच्या धर्तीवरच होती. दलित कवितेच्या सर्व विशेषांसह उदिष्टयांसह दलित कवयित्रीची कविता वाचक रसिकांपुढे आली त्यांच्या कवितेतही विद्रोह विशेषत्वाने आविष्कृत होतो.

काही कवयित्रीच्या कविताचा परामर्ष घेवु–सुंगधाताई शेंडे या पाहिल्या पिढिच्या आंबेडकरवादी जेष्ठ कवयित्री आहेत, 'विरतं धुक' हा त्यांचया पहिलाच काव्यसंग्रह आहे, त्यात त्यांनी आपले विद्रोही मन व वीचार कवितेचा माध्यमातुन व्यक्त केले आहे त्यांच्या कविता मधुन त्यांचे प्रज्ञावंत मन पेटून उठते, त्या म्हणतात्–

''जहालो स्वातंत्र्य, स्थपिले गणतंत्र
उद्‌घोषाचा मंत्र मानवतेचा

भारतात जातीयवाद, इथली विषमता नष्ट झाली नाही, विषमता पारंपारिक आहे. संताच्या काळात समता प्रस्थापित झाल्याचा निर्वाळा प्रस्थापित देतात. कवयित्री त्यांना सवाल करते.

विठ्ठलाचे पायरीला
अवघे नाचती रंगती
'चोखा' भुकेला दर्शना
अजुनही किती दूर

असे प्रश्न बंडखोर कवयित्री समाजव्यवस्थेला विचारते तसेच देशात भेदभाव, जातीयता, शोषण, दारिद्र उपासमार अशा अनेक समस्या असताना मी होळी कशी काय खेळू शकते असे तीचे विद्रोही व अंतर्मन म्हणते समाजातील हा भेदभाव आधी नाहिसा करा.

जातीयतेचा लाकुड फाटा
भेदभावाचे रॉकेल ओता
गरिबीची होळी पेटवा
येते खेळाया होळी

तसेच समाज व्यवस्थेतील विषमता तिच्या मनाला वेदना देते व त्याचा प्रतिकार करण्यासाठी, आक्रंदून विद्रोही स्वरात उच्चारते.

धगधगत्या पेटवा मशाली
जाळाया अंधारी वाट
धि:कार त्या धर्माचा
जो मानवतेची अडवी वाट

या आंबेडकरवादी कवयित्रीला आधीपासूनच माहिती आहे की काय जाळायचे आहे व काय उभारायचे आहे. अमानवी अंधार जाळण्यासाठी धगधगत्या मशाली पेटविण्याची त्यांची तयारी आहे.

यानंतरची महत्वाची आंबेडकरवादी कवयित्री म्हणजे हिरा बनसोडे या आहेत. त्यांनी आपल्या कवितामधून विद्रोही विचार अत्यंत समर्थपणे मांडला आहे. त्या म्हणतात.

'' अपमानाची भिक झोलीत टाकण्याच्या त्या अभद्र भूतकाळाला
या पेटलेल्या वर्तमानाचा सुरूंग लावा
जळून जावुदया ही शतकांचे दास्यत्व पत्करणारी लाचार अगतिक मने''

या देशातील दलितांचा भूतकाळ अत्यंत अपमानास्पद लाजीरवाणा होता, त्याची आठवन होवून त्यांचे मन अस्वस्थ्य होते व विद्रोहाने पेटून उठते भारतीय संस्कृती ही जातीयतेने बरबटलेली व धर्मांध आहे या संस्कृतीने स्त्रीला माणूस म्हणून मान्य केले नाही. म्हणून त्या फिर्याद व्यक्त करतांना म्हणतात.

ही माझी फिर्याद
आमच्या कर्म संस्कृतीवर आहे.
जिने आम्हाला बंद कोठडीत कैद केले आहे
जिथे आम्हाला बहिष्कृत आयुष्याचे दान आहे.

ही फिर्याद स्त्रीच्या बंडखोर मनाची आहे, जी क्रांती करायला तयार आहे. इतल्या रूढीवादाने व संस्कृतीने कैदयाचे जिणे वाटयाला दिले. उपेक्षित, वंचित ठरवून बहिष्कृतांचे जीने जगायला मात्र पाडले त्याचा त्या जळजळीत शब्दात निषेध व्यक्त करतात.

या नंतरची कवयित्री म्हणजे सुरेखा भगत या आहेत. त्यांचे काव्यविश्व विद्रोही प्रकृतीने व्यक्त होते. त्या म्हणतात.

आम्ही लोक सन्मार्गाने जाणारे
शांतीचा पुरस्कार करणारे
म्हणजे काही दुर्बल नव्हेत
    रात्रीलाही जागवू शकतो
    दिवसालाही झोपवू शकतो.

सुरेखा भगत यांनी आपले विद्रोही अंतर्मनच आपल्या कवितातून व्यक्त केले ते अत्यंत संयमित पध्दतीने शब्दात कुठल्याही प्रकारचा आक्रस्ताळेपणा, नकारात्मकता याला थारा नाही. तर आत्मविश्वास व सकारात्मकता प्रत्येक कवितेत जाणवते मा. फुले. डॉ. आंबेडकर सावित्रीबाई यांच्या विचार प्रेरणेतून भारतीय स्त्री मानसिकरित्या सबळ झाली आहे. तिच्यात संघर्षाचे बळ आले आहे. हे सांगताना कवयित्री म्हणतात

रोखून रोखून किती रोखाल ?
तेजस्वी मी प्रकटणारच

तेजस्वीपणे प्रगटणे हा या कवयित्रीचा स्वभाव धर्म आहे. यानंतरची अत्यंत महत्वपूर्ण कवयित्री म्हणजे ज्योती लांजेवार, स्वतःच्या कवितेची भूमिका विशद करतांना डॉ. ज्योती लांजेवार म्हणतात ''समाजातील विषमता तिला सहन होत नाही. जातीयता तिला स्वातंत्र्य देत नाही. रूढी, जुलुम अन्याय अत्याचार लुटालुट जाळपोळ, बलात्कार अशा अनेक प्रथांचा विरोधात बंड उभारायला ती सरसावते, अन्यायाला वाचा फोडण्याचा प्रयत्न करते. दिवे मालवून सुर्य उगवणारी थंड माणसांच्या थंड प्रदेशातून

वेदनांनी धग घेवून पावला पावलावर सरू पाहणारी माझी कविता, आहे.'' या त्यांच्या मनोगतामध्ये प्रस्थापित व्यवस्थे विरूध्द विद्रोह मांडलेला आहे.

मी धिक्कार करते त्यांचा..
जन्मोजन्मी जातीयता जोपासनाऱ्यांचा
मी धिक्कार करते त्यांचा
समाजाला विकणाऱ्या त्या
खुर्चीच्या दलालांचा

या पध्दतीने त्या अतिशय त्वेषाने विद्रोह मांडतात आयुष्याच्या आयुष्य उध्वस्त करणाऱ्यांच्या नरडीचा घोट घ्यायला कवयित्री सरसावते. ती अन्यायाविरूध्द प्रबुध्द झाली आहे. ज्यांनी स्त्रियांच्या विकासात खीळ घालण्यासाठी जाचक रूढी, परंपरा जन्माला घातल्या आहेत. ज्यांनी निकोष समाजनिर्मिती होऊ न देता कीड लावण्याचा प्रयत्न केला त्यांच्यासाठी कवियित्री त्वेषाने आपले विचार मांडते.

अंतरंगात काळोख जोपासून
ज्यांनी रूजवली आहे कीड
अशांच्या नरडीचा घेवून घोट
मी झाले आहे विषकन्या

या पध्दतीने कवयित्री ज्योती लांजेवार शब्दाचे प्रहार करते. ज्योती लांजेवार विद्रोहाचा अंगार आपल्या कवितेतून फुलवितात ज्यांनी उपेक्षितांच्या विकासावाटा अडविल्या आहेत. त्या अमानुषांच्या वस्तीला आग लावण्याची ताकद त्यांच्या कवितेत आहे.

उठ..... सूर्य उगवला आहे. नव्या क्रांतीचा
मुली, तुझे प्रसाधान आटोप लवकर
पदर खोच कमरेला... दारापुढे मोर्चा आहे.
वाटतं घ्याव हातात कोलीत
अन लावावी आग
या अमानुषांच्या वस्तीला
जिथे आपल्या सर्वस्वाची होळी झालीय.

इथल्या माणसा – माणसांना विभागणारी जात असुनही मनातून जात नाही घटना लागू होऊन पन्नास वर्ष झाल्यावरही जातीची मानसिकता नष्ट होत नाही अशा घट्ट रूजलेल्या प्रतिगामी मानसिकते वर कवयित्री हल्ला चढविते.

ही जात अशीच आडवी येत राहिली
तर हे सनातन्यांच्या मनू
मी तुझा पुन्हा एकदा करीन शिरच्छेद
या पध्दतीने ज्योती लांजेवार अत्यंत त्वेषाने व्यक्त होतात.

या नंतरच्या महत्वाच्या कवयित्री म्हणजे प्रज्ञा लोखंडे त्यांनी आपल्या कवितेतून स्त्रीच्या जीवनाचा समग्र आलेख वेगवेगळया पातळयावर व्यक्त केला आहे, अत्यंत तीव्र संवेदनशीलतेते त्या स्त्रीच्या जगण्याची

संगती लावतात.

विद्रोहाच्या पावसाला
नकाराची साथ आहे.
वेदनेच्या ढगाला माणुसकीचा हात आहे.

प्रज्ञा लोखंडे आपल्या कवितेतून बाईपणाच्या वेदना खुप वेगळया पध्दतीने मांडतात. पुरूषसत्ताक मानसिकता हे समजु शकत नाही.

कुणी दिला हा भोग
काचतोय गळाभर
माज्या जिण्यांच सरण
धडाधडा पेटलंय

जिवंतपणी स्त्रीच्या जगण्याचे सरण होतेय आणि स्त्रीला उदात्त लेखणाऱ्या समाजाला मात्र त्यांची किंचितही दखल नाही. या पध्दतीने प्रज्ञा लोखंडे आपल्या कवितेतून भावना व्यक्त करते.

वर्तमान व्यवस्था सभ्यता आणि संस्कृतीची कवयित्री चिरफाड करते व त्यातील वास्तव बाहेर काढते जी संस्कृती एकीकडे स्त्रियांचे दैवतीकरण करून उदात्ततेचा आव आणते आणि दुसरीकडे स्त्रियांना आपल्या निर्दयी टाचेखाली तुडविते. त्या संस्कृतीला नकाराशिवाय दुसरे काय मीळणार असे स्त्रीवादाचे समर्थ विद्रोही हुकार प्रतिभा अहिरे या कवियीत्रीच्या काव्यातून झाले आहे.

संपवू पाहतेय मी या चक्रव्युहाला
छेदण्या अनू भेदण्यातच
माझ्या 'स्त्रीत्वाने' ओढलेल्या अन् वेढलेल्या कुणाकुणाला टाळण्या फेटाळण्यात खर्च कराव सामर्थ्य''

स्त्रीचा आतील मनुष्यत्वाची ही वेदना आहे. परंपरेने लादलेले परावलंबित्व जाळून तिने पुढे टाकलेले हे एक पाऊल आहे. हे पाऊल विद्रोहाचा स्वर उंच करणारे आहे.

संस्कृतीच्या नावावर
धुडगूस घालणारांनो
तुम्हाला, माझ्या शब्दांनीच
वठणीवर आणणार आहे. मी
या विषमतेच्या रणांगणात
मानवतेसाठी लढणार आहे
यशाचे शिखर चढणार आहे.

असा ध्यास घेतलेल्या या सम्यक मनात उदयाचे उज्वल स्वप्न आहे हे स्वप्न साकार करण्यासाठी अनेक अडचणी दलित स्त्रीला माहिती आहेत. त्या अडचणीशी दोन हात करण्यास ती समक्ष झाली आहे असा प्रचंड आत्मविश्वासाने संध्या रंगारी यांच्या काव्यामध्ये पाहायला मीळतो. जातीयतेची गढी उद्ध्वस्त करून मानवतेची गुढी उभारण्याचा या कवयित्रींचा प्रयत्न आहे विद्रोहाचा विधायक स्वर त्यांच्या अनेक कवितामध्ये दिसतो दलित कवयित्री केवळ वेदनाच व्यक्त करीत नाहीत किंवा त्या केवळ नकार व्यक्त करीत नाहीत तर डोळस असे आत्मपरिक्षणही करतात दलितांचे नेतृत्व जसजसे वेठबिगारीला लागले तसेतसे

दलित चळवळीचे अवसान गळत गेले.

बाबा नू जिवंत असतांना
त्यांना साधता आला नाही डाव
घालता आला नाही घाव
तू गेल्यावर तुझा विचार उरला त्याला मारण्यासाठी
त्यांनी तुझाच अनुयायी वापरला

या प्रकारे समाजातील वास्तव त्यांनी आपल्या कवितामधून मांडले.

उषा हिंगोणेकर यांच्या वास्तववादी कविता आहेत. त्या आपल्या कवितेत क्रांतीचा इशारा देतात.

रस्त्यारस्त्यावर
छुपे हल्लेखोर दबा धरून आहेत.
पावलागणिक सुरूंग
पेरलेले आहेत
कुठल्याही क्षणी
आपण उद्ध्वस्त होवु शकतो.
हे ओळखुनच दोस्त हो
आता रस्त्यावर यावे लागेल

या अशा सर्वच कवयित्रीनी आपआपल्या कविता मधून विद्रोह मांडला आहे.

आंबेडकरवादी कवयित्रीचे आत्मभान तीव्र आहे. स्त्रीची सामाजिक स्थिती गती पारंपारिक विषमतामूलक समाजव्यवस्था आणि पुरूष प्रधान मानसिकता यामध्ये भरडल्या गेली आहे.

दलित कवयित्रीचे सामाजिक भान तीव्र आहे, म. फुले सावित्रीबाई फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रखर तेजस्वी आणि क्रांतीदर्शी विचारांनी आंबेडकरवादी कवयित्रीचे आत्मभान सजग झाले आहे. प्रचंड आत्मविश्वासाने या कवयित्री समस्यांना भिडतात व काव्यातून प्रस्थपित समाजाविरोधात विद्रोह व्यक्त करतात.

आंबेडकरवादी कवयित्रीची विद्रोही जाणीव केवळ विध्वसंक नाही तर विधायक दृष्टीही त्यांना लाभलेली आहे. या विद्रोही जाणीवेला सामाजिक आणि स्त्री वास्तवाचे दाहक भान आहे त्यामुळे त्यांचा कविता, पृथगात्म व आशयसंपन्न आहेत.

**संदर्भ ग्रंथ :–**

१. भालचंद्र फडके, 'दलित साहित्य वेदना व विद्रोह', श्रीविदया प्रकाशन पुणे तिसरी आवृत्ती २०००
२. यशवंत मनोहर, 'विद्रोही सांस्कृतिक चळवळ विशेषांक' तिसरे विद्रोही साहित्य संमेलन मुंबई ३१ जाने २००१
३. गंगाधर पानतावणे, प्रस्तावनेतून 'साक्ष' सुरेखा भगत, प्रशांत प्रकाशन, बुलढाणा १९९४
४. बाबुराव बागुल 'वेदा आधी तु होतास' दिशा प्रकाशन नाशिक २००४
५. वामन निंबाळकर 'गावकुसाबाहेरिला' कविता प्रबोधन प्रकाशन, नागपूर.